| MHND060013662022 | दाखल तारीख : ०५/११/२०२२<br>नोंदणी तारीख : ०५/११/२०२२<br>निकाल तारीख : ०४/०८/२०२६<br>कालावधी : ०३ व. ०८ म. ३० दि. |
|---|---|

# न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बिलोली यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री. ज्ञा. सु. निंबाळकर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.१४५/२०२२** **निशाणी क्र.(४०)**

## नमुना–अ

| | |
|---|---|
| **फिर्याद** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन अंमलदार, पोलीस स्टेशन बिलोली, ता. बिलोली जि. नांदेड |
| **उपस्थिती** | सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता,<br>**श्री. एम. के. मांडे** |
| **आरोपी** | मिर्झा खदीर बेग महेमुद बेग,<br>वयः– ४६ वर्षे, व्यवसायः– सामाजीक कार्य<br>रा. इनामदार गल्ली बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड. |
| **उपस्थिती** | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. मोहम्मद रिजवान अहेमद |

## नमुना–ब

| | |
|---|---|
| घटना दिनांक | ०५/०१/२०२० |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २८/११/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०५/११/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २८/०७/२०२३ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २८/०७/२०२३ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | -- |
| न्यायनिर्णय तारीख | ०४/०८/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर असेल तर | -- |

**नमुना–क**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत वर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | मिर्झा खदीर बेग महेमुद बेग | दि.२६/०१/२०२२ रोजी १४.३८ वा नोंद न.१२ वर नॉमिनल अटक | अटकपुर्व जामीन No/Cri.Sess/96/2022 Add. Sess. Court Biloli दि.१८/०१/२०२२ | भा.दं.वी ४२०, ४६८, ४७१. | निर्दोष | निरंक | निरंक |

**नमुना–ड**

**सरकारी साक्षीदार/ बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**<u>अ– सरकारी साक्षीदार</u>**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | बुशरा निझाम शेख | फिर्यादी |
| सा.क्र.०२ | आसरा अब्दुल शेख | साक्षीदार |
| सा.क्र.०३ | शेख बाबू हाजीसाब | घटनास्थळ पंच |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.०४ | मारोती रामचंद्र मालुसरे | पंच साक्षीदार |
| सा.क्र.०५ | शेख सलाउद्दीन नदीमसाब | साक्षीदार |
| सा.क्र.०६ | शेख अफजल पाशा बंदगीसाब | साक्षीदार |
| सा.क्र.०७ | शेख निजाम बंदगीसाब | साक्षीदार |
| सा.क्र.०८ | शेख बशीर शेख बाबूमिया | साक्षीदार |
| सा.क्र.०९ | सय्यद मोहीयोद्दीन जफरोद्दीन | तपासीक अंमलदार |

**ब– बचावपक्ष साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क– न्यायालय साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**(अभियोगपक्षातर्फे/आरोपीतर्फे पुरावा निशाणी क्रमांक यादी)**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | नि.१५ | फिर्यादी |
| २. | नि.१६ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | नि.१७ | आक्षेप अर्जावरील अर्जदार क्र.२ ची सही |
| ४. | नि.२३ व २४ | जमीन गट क्र.३१०–ब/१ व ३१०–ब/२ चे साक्षांकित उतारे. |
| ५. | नि.२६ | घटनास्थळ पंचनामा |
| ६. | नि.३५ | घटनास्थळ पंचनाम्यावर अनु.क्र.२ वरील साक्षीदाराची सही |
| ७. | नि.३७ | हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| ८. | नि.३८ | अटक पंचनामा |

**ब–बचावपक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | निशाणी क्र.०९ | दोषारोपपत्र |

**ड–जप्त मुद्देमाल**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | –– | आरोपीने तयार केलेले शपथपत्र |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०४/०८/२०२६ रोजी पारीत)

आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६८, ४७१ कायद्यान्वये दंडनिय असणा–या अपराधा करिता खटला चालविण्यात येत आहे.

**अभियोगपक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात खालील प्रमाणेः**

२. आरोपीने दि.०५/०१/२०२० रोजी आपले नावे शपथपत्र तयार केले की, मिर्झा महेमुद बेग पि. मोहम्मद बेग यांचा मी एकटाच वारसदार आहे असे शपथपत्र

स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी तयार करुन तो मुख्याधिकारी नगर परिषद बिलोली व तहसिल कार्यालय बिलोली येथे दाखल करून घेवुन आरोपीचे वडीलांचे नावे असलेली मालमत्ता नगरपालीका क्र.१४२८, १४२९ व शेत गट क्र.३१०/ब/१ आणि ३१०/ब/२ क्षेत्रफळ १५ आर आणि ६५ आर ही आपले नावाने करुन घेवुन फिर्यादी व तिची बहिण वारसदार असताना त्यांचे नाव शपथपत्रामध्ये उल्लेख न करता त्यांची जाणुनबुजुन फसवणुक केली व त्यांचे हक्कापासुन वंचित केले. सबब, हि फिर्याद.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा क्र.२३४/२०२१ भारतीय दंड विधान कलम ४२०, ४६८, ४७१ अन्वये नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक एम.झेड. सय्यद यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपीविरुध्द उपरोक्त कलमाखाली दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द निशाणी क्र.९ प्रमाणे दोषारोप निश्चीत करुन तो त्याला त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपीचे निवेदन निशाणी क्र.१० वर नोंदविण्यात आले. निवेदनात आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण नऊ

साक्षीदारांना तपासले.

६. अभिलेखावर आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) खाली आरोपीचे निवेदन निशाणी क्र.३९ वर नोंदविण्यात आले.

७. दोन्ही पक्षाच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद व न्यायालयासमोर आलेला तोंडी पुरावा आणि दाखल कागदपत्रावरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्याचे निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ०५/०१/२०२० रोजी बिलोली येथे आरोपीने स्वतःच्या फायद्यासाठी तो मिर्झा महेमुद बेग पि. मोहम्मद बेग यांचा एकटाच वारसदार असल्याबबात खोटा शपथपत्र तयार करुन नगरपरिषद व तहसिल कार्यालयात दाखल करुन मालमत्ता स्वतःच्या नावावर करुन घेतली व भा.द.वि. चे कलम ४२० नुसार गुन्हा केला ? | **नाही** |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने स्वतःच्या फायद्यासाठी तो मिर्झा महेमुद बेग पि. मोहम्मद बेग यांचा एकटाच वारसदार असल्याबबात खोटा शपथपत्र तयार करुन त्याचा वापर केला व बनावटीकरण केले व भा.द.वि. चे कलम ४६८ नुसार गुन्हा केला ? | **नाही** |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळी व | |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी आरोपीने स्वतःच्या फायद्यासाठी तो मिर्झा महेमुद बेग पि. मोहम्मद बेग यांचा एकटाच वारसदार असल्याबबात खोटा शपथपत्र तयार करुन मालमत्ता स्वतःच्या नावावर करुन घेतली व सदरचे खोटे शपथपत्र हे खरे असल्याचे भासवले व भा.द.वि. चे कलम ४७१ नुसार गुन्हा केला ? | **नाही** |
| ४. | काय आदेश ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुददा क्र.१ करिता</u>

८. आरोपी वरील गुनहा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला असे शाबीत करावे लागेल की, दिनांक ०५/०१/२०२० रोजी बिलोली येथे आरोपीने स्वतःच्या फायद्यासाठी तो मिर्झा महेमुद बेग पि. मोहम्मद बेग यांचा एकटाच वारसदार असल्याबबात खोटा शपथपत्र तयार करुन नगरपरिषद व तहसिल कार्यालयात दाखल करुन मालमत्ता स्वतःच्या नावावर करुन घेतली.

९. आरोपीविरुध्द आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ बुशरा व साक्षीदार क्र.२ यांना तपासले. सदरच्या दोन्ही साक्षीदार सख्या बहिणी असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्या आरोपीला ओळखत असुन ते त्याचे काका आहेत. त्यांच्या काकाने ते एकटेच मोहम्मद बेग यांचे

वारस असल्याचे दाखवून व शेती नाववर करुन घेतले. त्यांनी घर क्र. १४२८ व १४२९ व शेती गट क्र.३१०/ब/१ व ३१०/ब/२ हे नाववर करुन घेतले. सदरील गट क्र.३१०/ब/१ शेतीचे क्षेत्रफळ १५आर असून ३१०/ब/२ शेतीचे क्षेत्रफळ ६५ आर असे आहे. सदरील घरे व शेती पूर्वी त्याच्या आजोबांच्या म्हणजेच त्यांच्या वडीलांचे वडील यांच्या नावावर होते. त्यांच्या आजोबाला दोन मुले आहेत. त्यांची नावे बशीर बेग व खदीर बेग अशी आहेत. तसेच त्यांच्या आजोबांना चार मुली आहेत. त्यांची नावे रफीकबेगम, रुक्सानाबेगम, अखबरीबेगम, शहनाजबेगम अशी आहेत. त्यांच्या वडीलांना ती व आसराबेगम अशा दोन मुली आहोत. त्यांचे आजोबा दिनांक १२/०८/२००८ रोजी वारले. तसेच, त्यांची आज्ञी दिनांक १४/०१/२०२० रोजी वारली आहे. त्यांच्या काकांनी नगरपालिका बिलोली येथे ते एकटेच वारस असल्याबाबत शपथपत्र देवून त्यांच्या नावाने दोन्ही घरे नावचे करुन घेतले. तसेच त्यांनी तहसिलमध्ये अर्ज देवून सदरील जमीनी त्यांच्या नावाने करुन घेतल्या. त्यांच्या काकांनी घर व शेती त्यांच्या नावावर झाल्यावर त्यांनी त्यांचा हिस्सा देण्यास नकार दिला.

१०. पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, जेव्हा त्यांना माहीती झाले की, त्यांच्या काकांनी सदरील घरे व शेती त्यांच्या नावाने करुन घेतली तेव्हा त्यांनी गावातील प्रतिष्ठीत लोकांना बोलावून बैठक घेतली. त्यानंतर साक्षीदार क्र.१ हिने

पोलीस स्टेशनला तिच्या काकाविरुध्द तक्रार दिली. तिने तक्रार निशाणी क्र.१५ शाबीत केली. त्यावर तिची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे कथन केले. तसेच तिने छापील प्रथम खबर अहवाल निशाणी क्र.१६ शाबीत केली. त्यावर साक्षीदार क्र.१ हिची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले.

११. फिर्यादी साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, त्यांच्या वडीलांचे नाव मिर्झा बशीर बेग आहे. त्यांच्या वडीलांच्या मृत्यूपूर्वी ती, तिचे वडील त्यांच्या आजोबासोबत राहत होती. त्यांचे वडील दिनांक ३१/०३/१९९७ रोजी मरण पावले. त्यांच्या वडीलांचा मृत्यू त्यांचे आजोबा हयात असतांना झालेला आहे. साक्षीदार क्र.१ चे आजोबाच्या मृत्यूच्यावेळी तिचे वय अंदाजे १० ते १२ वर्ष असेल व साक्षीदार क्र.२ हिचे वय १३ ते १४ वर्ष असेल. त्यांच्या आईचे नाव शाईनबेगम असे आहे. त्यांच्या वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आईला त्यांचे नाना म्हणजे (आईचे वडील) घेवून गेले होते. त्यांच्या आईचे लग्न तिची आई तिच्या वडीलांकडे आल्यानंतर ३ वर्षांनी सय्यद खाजा हुसेन यांच्या सोबत झाले. त्यांचे आजोबा जिवंत असतांना त्यांचे आजोबांच्या घरी जाणे येणे चालू होते. साक्षीदार क्र.१ ने पोलीसांना तक्रार देतांना तिच्या काकांनी घर व शेती त्यांच्या नावावर झाल्यावर त्यांना तिचा हिस्सा देण्यास नकार दिला असे सांगितले होते. मात्र, तिला फिर्याद दाखवली असता सदरची बाब फिर्यादीत नमुद नसल्याचे तिने मान्य केले व त्याचे कारण

तिला सांगता येणार नाही असेही तिने सांगितले. त्यांना जेव्हा कळाले की, त्यांच्या काकाने घर व शेती त्यांच्या नावाने करुन घेतली तेव्हा त्यांनी नगरपालिकेमध्ये आक्षेप अर्ज दिला होता. साक्षीदार क्र.१ सदरचा अर्ज तक्रार देतांना पोलीसंना दिला नव्हता. पोलीसांना दिला नव्हता. साक्षीदार क्र.१ ने तहसिल कार्यालयाला आक्षेप अर्ज दिला होता. साक्षीदार क्र.१ हिने सदरचा अर्ज तक्रार देतांना पोलीसांना दिला नव्हता.

१२. पुढे त्यांच्या उलटतपासात असे देखील आले आहे की, आरोपीने त्यांच्या बहिणीसांबत मिळुन बिलोली येथील दिवाणी न्यायालय व.स्तर येथे वारसाप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज केला होता व सदर अर्जामध्ये तिने व तिच्या बहीणीने आक्षेप अर्ज दिनांक २८/०८/२०२१ रोजी निशाणी क्र.१७ अन्वये दाखल केला होता. सदर आक्षेप अर्जावर पूर्ण सुनावणी होवून न्यायालयाने तिचा आक्षेप अर्ज नामंजूर केला. तसेच, सदर साक्षीदारांनी असे देखील मान्य केले की, त्यांनी आरोपीने वारसाप्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जात आक्षेप अर्ज दिल्यानंतरच सदरची फिर्यादी दिली आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन असे निदर्शनास येते की, फिर्यादीचे वडील हे त्यांचे आजोबा हयात असताना मयत झालेले आहे. तसेच, आरोपीने वारसाप्रमाणपत्र मिळवण्यासाठी मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली येथे जो अर्ज दाखल केला होता त्यामध्ये फिर्यादीने आक्षेप नोंदवला होता त्या प्रकरणामध्ये पुर्ण सुनावणी होऊन मा. न्यायालयाने फिर्यादीचा आक्षेप नामंजुर केला आहे. तसेच,

साक्षीदार क्र.२ हिने तिच्या उलटतपासात असे देखील मान्य केले की, शरीयत कायदयानुसार वडीलांचे आजोबा हयात असताना निधन झाल्यास त्या मयत मुलाच्या मुलांना अथवा मुलींना हिस्सा मिळत नाही. याउपर सदर साक्षीदारांनी नेमक्या कशा प्रकारे आरोपीने फिर्यादीची फसवणुक केली ही बाब पुरेश्या कागदोपत्रा आधारे अभिलेखावर आलेली नाही. सदर साक्षीदाराची साक्ष केवळ औपचारीक स्वरुपाची असल्याने ती अभियोग पक्षास उपयोगी ठरणार नाही.

१३. साक्षीदार क्र.३ शेख बाबू हाजीसाब यांना तपासले असता त्यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.२९/११/२०२१ रोजी पोलीसांनी त्यांना नगरपालीका, बिलोली येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला. त्यांनी पंचनाम्यावरी अनु.क्र.०१ वरील त्यांची सही ओळखली व पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले व पंचनामा निशाणी क्र.२६ शाबीत केला. पुढे त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, नगरपालीका, बिलोली येथून श्री. सय्यद यांनी त्यांना तहसिल कार्यालय, बिलोली येथे नेले व तेथील आवक–जावक विभागात घेवून गेले. त्यांनी आवक–जावक विभागात पंचनामा केला. त्यां पंचनाम्यावर त्यांची सही आहे. त्यांनी सदरील पंचनामा निशाणी क्र.२७ वर शाबीत केला.

१४. सा.क्र.३ यांनी त्यांच्या उलटतपसात असे कथन केले आहे की, शेख सलाउद्दीन नदीमसाब त्यांचे नातेवाईक आहेत. शेख सलाउद्दीन नदीमसाब हे बुशराचे आजोबा आईचे वडील आहेत. श्री. सय्यद हे पोलीस शेख सलाउद्दीन यांच्या घरी भाडयाने राहत होते. शेख सलाउद्दीन यांनी त्यांना दोन पंचनामे करायचे आहेत व त्यावर सही कर असे सांगितले होते. दोन्ही पंचनाम्यात काय मजकुर लिहीला आहे हे त्यांना सांगता येणार नाही. पंचनाम्यावर फक्त त्यांची सही आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. पुढे त्यांनी तपासीक अमंलदार श्री. सय्यद हे फिर्यादीचे वडील शेख सलाउद्दीन यांच्या घरी भाड्याने राहत होते असे कथन केले आहे. तसेच, त्यांनी शेख सलाउद्दीन यांच्या म्हणण्यानुसार दोन्ही पंचनाम्यावर सही केल्याचे दिसुन येते, त्यांना सदरील पंचनाम्यामध्ये काय मजकुर लिहीले आहे हे त्यांना सांगता आलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीवर पुर्णतः विसंबुन राहता येणार नाही.

१५. साक्षीदार क्र.४ मारोती रामचंद्र मालुसरे यांना तपासले असता त्यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते मिर्झा खदीर बेग मिर्झा महेमुदबेग यांना ओळखतात. दि.०५/०१/२०२० रोजी ते मिर्झा खदीर बेग यांच्यासोबत आले नव्हते. त्यांना अभिलेखावरील दोन शपथपत्रे दाखवले असता त्यांनी त्यावर त्यांची नाही नाही असे कथन केले. सरकारी वकिलांनी

उलटतपास घेतला असता त्यांनी सर्व सुचना नाकारल्या. त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षास उपयोगी नाही.

१६. साक्षीदार क्र.५ हे फिर्यादीचे आजोबा (आईचे वडील) असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांच्या मोठ्या मुलीचे नाव शाहीना बेगम आहे. तिचा विवाह मिर्झा बशीर बेग याच्यासोबत सन–१९९३ मध्ये झाला. तिला दोन मुली नामे आसरा बेगम व बुशरा बेगम झाल्या. दिनांक ३१.०३.१९९७ रोजी मिर्झा बशीर बेग याचा मृत्यु झाला. दुःखाचे ४० दिवस झाल्यानंतर मिर्झा खदीर बेग याने त्यांना हाकलून दिले व त्या त्यांच्याकडे रहायला आल्या. त्यांनी त्यांचे पालनपोषण केले. सन २००० मध्ये शाहीनाचा त्यांनी दुसरा विवाह सय्यद खाजा हुसेन याच्याशी लावून दिला. त्यांनी तिच्या मुलींचा सांभाळ केला व त्यांना शिकवून त्यांचा विवाह लावला. मिर्झा खदीर बेग यांचे वडिल म्हणजे दोन्ही मुलींचे आजोबा यांच्या नावे जमीन व घर आहे. घराचा क्रमांक १४२८ व १४२९ आहे. जमीनीचा गट क्र. ३१०/ब/१ व ३१०/ब/२ अशी दोन एकर जमीन आहे. खदीर बेग याने गेल्या २५ वर्षापासून त्यांच्या दोन्ही नातींना तुम्हाला जमीन देतो असे सांगून जमीन त्यांना दिल्या नाहीत.

१७. साक्षीदार क्र.५ यांनी त्यांच्या उलटतपसात असे कथन केले आहे की, त्यांना दोन मुली आहेत. त्यातील शाहीन ही वयाने मोठी आहे. शाहीनचा विवाह

करण्यापुर्वी तिच्या सासरच्या नावे कोणत्या जमीनी आहेत याची त्यांना माहिती होती. शाहीनचे सासरे महेमुद बेग यांचे सन–२००८ मध्ये निधन झाले. त्यांच्या जावयाचा मृत्यु त्याचे वडील ह्यात असतांना झाला. त्यांच्या जावयाच्या मृत्युच्या तीन वर्षानंतर त्यांनी शाहीनचा धर्माबाद येथे दुसरा विवाह लावून दिला. ते एम. झेड. सय्यद या पोलीसास ओळखतात.ते सदर प्रकरणातील तपासी अंमलदार आहेत. सदरचा साक्षीदार याने स्वतःहुन मान्य केले की, ते त्यांच्या घरात भाडेकरु म्हणून रहात होते व त्यांचे त्यांच्यासोबत चांगले संबंध होते.

१८. पुढे त्यांच्या उलटतपसात असे आले आहे की, आरोपीने बिलोली येथील न्यायालयात त्याच्या बहिणींसह वारस प्रमाणपत्र मागणीचा अर्ज दाखल केला होता किंवा कसे ते त्यांना माहित नाही. मात्र, सदर अर्जात त्यांच्या दोन्ही नातींनी त्यांना वारस म्हणून घोषीत करावे अशा मागणीचा अर्ज दाखल केला होता हे मान्य केले आहे व बिलोली न्यायालयाने त्यांच्या नातींचा अर्ज नामंजूर केला. औरंगाबाद न्यायालयात दाखल केलेले अपील नामंजूर झाली आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन असे निदर्शनास येते की, सदरील साक्षीदार हे फियादीचे आजोबा (फिर्यादीचे आईचे वडील) असुन असल्यामुळे त्यांच्या साक्षीवर शंका निर्माण होते कारण ते फिर्यादीचे जवळचे नातेवाई आजोबा असल्यामुळे ते निपक्षपणे कथन केले किंवा कसे हयावर शंका निर्माण होते. तसेच, आरोपीने फिर्यादीची नेमकी कशी फसवणुक केली याबाबत कोणताही

पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त नाही.

१९. साक्षीदार क्र.६ व ७ हे फिर्यादीचे पती व तिच्या बहिणीचे पती असुन दोन्ही साक्षीदारांची साक्ष केवळ औपचारी स्वरुपाची आहे. सदर साक्षीदारांच्या सरतपासाचे व उलटतपासाचे अवलोकन करता आरोपी विरुध्द सबळ पुरावा निर्माण होईल असे कोणतेही कथन अभिलेखावर आलेली नाहीत. त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षास आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत होण्यास अजीबात उपयोगाची नाही.

२०. साक्षीदार क्र.८ शेख बशीर शेख बाबूमिया यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.२९/११/२०२१ रोजी पोलीसांनी त्यांचा बोलावले होते. पोलीसांनी त्यांच्यासमोर काहीही केले नाही. त्यांची फक्त सही घेतली. त्यांनी घटनास्थळ पंचनाम्यावर अनु.क्र.०२ वर त्यांची सही असल्याचे कथन त्यातील मजकुर त्यांना माहित नाही असे कथन केले आहे. त्यामुळे सदर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षास उपयोगी नाही.

२१. साक्षीदार क्र.९ हे सदर प्रकरणातील तपासी अंमलदार असुन त्यांची साक्ष औपचारी स्वरुपाची आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक २८.११.२०२१ रोजी ते पो.उप नि या पदावर बिलोली पोलीस ठाणे येथे

कार्यरत होते. त्यादिवशी गु.र.क्र. २३४/२०२१ कलम ४२०, ४६८ व ४७१ भा.दं.वि. चा तपास त्यांच्याकडे देण्यात आला होता. तपासकामी त्यांच्याकडे फिर्याद व प्रथम खबर अहवाल सोपवला होता. त्यांनी घटनास्थळावर जावून पंचांसमक्ष दोन घटनास्थळ पंचनामे केले. त्यांनी निशाणी क्र. २६ व २७ कडील घटनास्थळ पंचनाम्यावर पंचांच्या व त्यांची सही आहे असे कथन करुन घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे. तहसिल कार्यालयात पत्रव्यवहार करुन आवश्यक कागदपत्र मिळवून अभिलेखात सामील केले. आरोपीच्या स्वाक्षरीचे नमुने घेवून कागदपत्रात सामील केले. आरोपीच्या स्वाक्षरीचे नमुने तपासणीसाठी हस्ताक्षर तज्ञाकडे पत्राने पाठविले. सदर पत्रावर त्यावर माझी सही असून त्या पत्राला निशाणी क्र. ३७ वर शाबीत केले. आरोपीला अटक करुन अटकेचा पंचनामा केला, सदर पंचनाम्यावर आरोपीची, पंचांच्या व त्यांची सही असुन अटक पंचनाम्यास निशाणी क्र. ३८ वर शाबीत केला. तपासादरम्यान आरोपीने दाखल फिर्यादीप्रमाणे गुन्हा केल्याबाबत आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्याविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास ते ओळखू शकतात. आरोपीला न्यायालया समक्ष ओळखले.

२२. साक्षीदार क्र.९ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले की, ते देशमुखनगर येथे बुशरा – फिर्यादी हिच्या आजोबांच्या घरात भाडयाने रहात होते. त्यांनी

पंचांना दोन्ही घटनास्थळ पंचनाम्याबाबत लेखी नोटीस दिली नव्हती. त्यांनी घटनास्थळ पंचनामा करतेवेळी अक्षांश व रेखांश फोटोत नमूद केले नाही. दिवाणी न्यायालयाने त्यांचा आक्षेप फेटाळून आरोपीला वारस म्हणून प्रमाणपत्र दिले किंवा कसे ते त्यांना माहित नाही. दोषारोपासोबत हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल दाखल नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन असे निदर्शनास येते की, त्यांनी पंचांना दोन्ही घटनास्थळ पंचनाम्याबाबत लेखी नोटीस दिली नव्हती व त्यांनी घटनास्थळ पंचनामा करतेवेळी अक्षांश व रेखांश फोटोत नमूद केले नाही. तसेच, सदरील साक्षीदार हे फिर्यादीचे आजोबा शेख सलाउद्दीन यांच्या घरी भाडयाने राहत होते असे दिसुन आलेले आहे. तसेच, त्यांनी हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांनी सदरील प्रकरणात निपक्षपणे तपास केला किंवा कसे यावर शंका निर्माण होते म्हणुन सदरील साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षास उपयुक्त ठरणार नाही.

२३. सदर प्रकरणात आरोपी विरुध्द फिर्यादीचे असे आरोपी होते की, आरोपीने फिर्यादी व तिच्या बहिणीचा मालमत्तेतील कायदेशीर हक्क डावलुन सदरची मालमत्ता बनावट शपथपत्रा आधारे स्वतःच्या नावावर करून घेतली व फिर्यादी व तिच्या बहिणीस मालमत्तेतुन बेदखल करून टाकले व फिर्यादीचे व तिच्या बहिणीची बनावट कागदपत्रा आधारे फसवणुक केली. मात्र, प्रस्थापीत मुस्लीम कायद्याचे अवलोकन करता शरीयत कायद्यानुसार वडीलांच्या हयातीत जर त्यांचा मुलगा मयत

झाला असेल तर त्यांची मुले ही आजोबाची वारस होत नाहीत. त्यामुळे, मिळकतीमध्ये हिस्सा मागु शकत नाहीत. अशा परिस्थीतीत जर आरोपीने त्याच्या नावे तो शपथपत्र करुन घेत असेल तर तो वैध आहे. त्यामुळे आरोपीने फिर्यादी व तिच्या बहिणीची फसवणुक केली असे म्हणता येणार नाही.

२४. एकंदरीतच अभिलेखावरील पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता, आरोपीने खोटे शपथपत्र तयार करुन मिळकत स्वतःच्या नावावर करून घेतले हे स्पष्टपणे शाबीत झालेले नाही. तपासलेल्या साक्षीदारांची साक्ष ही आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरिता पुरेशी नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरला आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्रमांक ४ करीता</u>

२५. अभिलेखावरील पुरावा आरोपीस गुन्हयात दोषी धरण्याइतपत स्पष्ट, सबळ व पुरेसा नाही. त्यामुळे फौजदारी प्रणाली नुसार आरोपीविरुध्द दोषारोप संशयापलिकडे अभियोग पक्षाने शाबित केलेला नाही. यास्तव मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी **मिर्झा खदीर बेग महेमुद बेग** याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ |

| | |
|---|---|
| | (१) नुसार, भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६८ व ४७१ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीने दिलेला वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | जप्त मुद्देमाल आरोपीने तयार केलेले शपथपत्र हे अपिला कालावधी संपल्यानंतर आरोपीस परत देण्यात यावे. |
| ४. | आरोपीने रक्कम रु.५०,०००/– (रुपये पन्नास हजार फक्त) चे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत दयावे व सदर जामीन बंधपत्र सहा महिनेपर्यंत अस्तित्वात राहील. |
| | **न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.** |

DNYANESHWAR SURYAKANT NIMBALKAR

Digitally signed by DNYANESHWAR SURYAKANT NIMBALKAR
Date: 2026.08.04 18:05:45 +0530

दिनांकः ०४/०८/२०२६.

ठिकाणः नांदेड

**(ज्ञा. सु. निंबाळकर )**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बिलोली.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, संगणक प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करुन घातलेल्या न्यायनिर्यामधील शब्दनशब्द हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव - ए.के. मोहम्मद, लघुलेखक -III

न्यायालयाचे नाव - न्यायदंडाधिकारी प्र. श्रे. बिलोली

न्यायनिर्णय दिनांक - ०४/०८/२०२६.

न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक - ०४/०८/२०२६.

न्यायनिर्णय संगणत प्रणालीमध्ये क्रमावली नक्कल करुन घेतल्याचा दिनांक - ०४/०८/२०२६.